B.Sc. / B.Sc. ( I.T.) / B.C.A.(Sci.) / B.Com. (with Credits)-Regular-Semester 2012 Sem II

**2S1004 / 2BIT23 / 2BCA23 / 0229 : Compulsory Marathi (आवश्यक मराठी )**

P. Pages : 2 **GUG/W/16/5529C**

Time : Three Hours Max. Marks : 80

* 4 9 6 1 *

---

**1.** जागतिकीकरण म्हणजे काय हे सांगून त्याचा मराठी साहित्यावर झालेला परिणाम स्पष्ट करा. **16**

**किंवा**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुचविलेल्या घटनात्मक तरतुदींचा सविस्तर आढावा घ्या.

**2.** 'तयास मानव म्हणावे का?' या सावित्रीबाई फुलेंच्या काव्यातील माणसाविषयीचे मूलभूत चिंतन स्पष्ट करा. **16**

**किंवा**

'अरे, पुन्हा आयुष्यांच्या पेटवा मशाली !' असे आवाहन कवी सुरेश भटांनी का केले आहे ?

**3.** पुढीलपैकी **कोणात्याही एकाच** गटातील प्रश्नांची उत्तरे सुमारे शंभर शब्दात लिहा. **16**

**गट 'अ'**

क) उद्योजकता अंगी भिनवणे आता अपरिहार्य झाले आहे, असे लेखक का म्हणतात?

ख) ग्रामजीवनात मर्यादा आणि रीतिरिवाजांना अधिक महत्व असते, असे मधुकर वाकोडे का म्हणतात?

ग) 'लोककलांना फार वाईट काळ आला आहे,' असे लेखक का म्हणतात?

घ) पहिल्यांदा वाघ पाहिल्यावर लेखकाच्या मनाची अवस्था कशी झाली?

**किंवा**

**गट - 'ब'**

च) 'लोकगीतांतील स्त्रियांचे भावविश्व बाळाभोवती पिंगा घालते,' असे लेखक का म्हणतात?

छ) स्पर्धेच्या युगात उद्योगधंद्यात टिकण्याकरीता मराठी माणसाने काय केले पाहिजे ?

ज) 'अस्वल' या बेभरवशाच्या जनावराचे वर्णन लेखकाने कसे केले आहे?

झ) 'दंडार' ही लोककला टिकविण्यासाठी शाळा, विद्यालये व महाविद्यालये यांची जबाबदारी स्पष्ट करा.

munotes.in

**4.** पुढीलपैकी **कोणत्याही एकाच** गटातील प्रश्नांची उत्तरे सुमारे शंभर शब्दात लिहा. **16**

**गट - 'क'**

त) सत्य, न्याय आणि स्वर्ग या संदर्भात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी कोणता वर मागितला?

थ) 'पाची बोटावर किस्न । लोनी राहेला झेलून।।' असे कवी कोणत्या संदर्भात म्हणतात?

द) 'माय' घरी येण्यापूर्वीची तिच्या मुलांची अवस्था कवीने कशी वर्णन केली आहे?

ध) 'इथं जगायचं स्वातंत्र्य नाही, कोणता हा देश !' या ओळीचा भावार्थ स्पष्ट करा.

**किंवा**

**गट - 'ड'**

प) राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी 'मानवता' आणि 'राष्ट्रभावना सर्वांना कळो, असा वर का मागितला?'

फ) पऱ्हाटीच्या नख्खीतून फुलून आलेल्या कापसाचे वर्णन कवीने कसे केले आहे!

ब) मायच्या पायातून भळाभळा रक्त का वाहत होते?

भ) वेडीपिशी झालेली आदिवासी तरूणी येणाऱ्या जाणाऱ्याला कोणते प्रश्न विचारते ?

**5.** पुढील सर्व प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी शंभर शब्दात लिहा. **16**

1) या जेट युगातसुध्दा मराठी माणूस अद्यापही म्हणावा तितकासा उद्योगप्रिय झालेला नाही, असे लेखक का म्हणतात?

2) 'सासुने सुनेला किल्ल्या देण्याची समस्या दंडारीत आहे.'
असे लेखकाला का वाटते?

3) आदिवासींच्या पुरातन समृध्दीचे वर्णन कवयित्रीने कसे केले आहे?

4) 'हा जातिभाव विसरूनिया एक हो अम्ही' या ओळीचा भावार्थ स्पष्ट करा.

***********

munotes.in